Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 (I)

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

Scanned with CamScanner

56. मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची भूमिका 155
**विजयकुमार गोविंदराव बिराजदार**

57. मानवाधिकार आणि महिलांच्या कौटुंबिक समस्या 158
**प्रा. श्रीमती. देशमुख के. एस.**

58. मानव अधिकाराचे प्रकार 160
**प्रा. डॉ. बावा ए.एस.**

59. मानव अधिकार आणिकामगार 162
**प्रा.डॉ.घोडके एस.बी.**

60. मानव अधिकार आणि भारतीय राज्यघटनेतील तरतुदी 164
**प्रा.डॉ. कांबळे विठ्ठल मारूती**

61. महिलांचा विकास आणि मानवाधिकार 166
**प्रा. डॉ. मुळे ए. बी.**

62. शिक्षण व मानवाधिकार 168
**प्रा. डॉ. सपाटे ए. के.**

63. महिला आणि मानवी हक्क 170
**कु. आशा ज्ञानेश्वर फत्तेपुरे**

64. महिला आणि मानवी हक्क 173
**कु. पुजा कमलाकर तिप्पणबोने**

65. भारतीय राज्यघटनेतील मानवी अधिकार 176
**प्रा.शहाणे रंजना प्रल्हादराव**

66. मानवी हक्क आणि बालशिक्षण 179
**प्रा. राजाभाऊ बंकटराव भगत**

67. मानवी हक्कांची अंमलबजावणी 181
**गणेश दामाजी सुर्यवंशी**

68. मानवी हक्क आणि महिला 185
**डॉ. आर.के. काळे**

69. मानवी हक्क - एक अभ्यास 189
**प्रा.डॉ.होदलुरकर एन.व्ही.**

70. मानव अधिकार आणि महिला 191
**प्रा. शितल रुद्रमनी येरुले**

71. मानवाधिकाराचे प्रकार 192
**डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे**

72. मानवाधिकार आणि भारतीय संविधान 194
**डॉ. सुहास रंगनाथ मोराळे, महेश कांबळे**

73. मानवाधिकार आणि भारतीय राज्यघटना 196
**प्रा.कातळे संगिता गुलाबराव**



Scanned with CamScanner

ISSN- 2348-7143
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवी हक्क आणि महिला

**डॉ. आर.के. काळे**
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

---

**प्रस्तावना :-**

प्रसिद्ध राजकिय विचारवंत रूसो म्हणतो की, "मनुष्य हा जन्मतः स्वतंत्र आहे", काही मुलभूत हक्क त्याला जन्मल्यापासून मिळतात. प्रत्येकाचा सर्वांगीण विकास व्हावा, प्रत्येकाचं जीवन सुजलाम, सुफलाम व्हावे, प्रत्येकाला जन्मात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, प्रत्येकाला जन्मात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी या विचार धारेतुन मानवी हक्कांची संकल्पना साकारतांना दिसते. व्यक्तीला आपले जीवन योग्य प्रकारे जगता यावे म्हणून निसर्गाने काही हक्क मानवाला बहाल केले आहेत. त्या हक्कांना नैसर्गिक हक्क म्हणतात. भारतीय राज्य घटनेने देखील काही अधिकार दिले आहेत. या हक्कांमध्ये आपणाला जिवीताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, धर्मस्वातंत्र्याचा हक्क, व्यवसायाचा हक्क, शोषणाविरूद्धचा हक्क, वैयक्तीक संरक्षणाचा हक्क, कुटूंबाचा हक्क, जिवीताचा हक्क, समतेला हक्क, विवाहाचा हक्क, विचाराचा हक्क, भाषणाचा हक्क, शिक्षणाचा हक्क, संचारस्वातंत्र्याचा हक्क संघटनेचा हक्क इत्यादी हक्कांचा उल्लेख आपल्याला करता येईल. प्रस्तुत शोध निबंधामध्ये संशोधकाने मानवी हक्क आणि महिला सशक्तीकरण संदर्भातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील झालेल्या प्रयत्नांचा उहापोह करून उपाययोजना सुचविल्या आहेत.

**व्याख्या :-**

**प्रा. लास्की**

"हक्क म्हणजे समाज जीवनाच्या अशा अटी आहेत की, ज्या शिवाय कोणतीही व्यक्ती स्वतःचा सर्वांगीण विकास करू शकत नाही."[1]

**मॉरिस कॅटसन -**

मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असुन त्यांचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.[2]

**मॅकफरलेन -**

मानव अधिकार हे असे नैतिक अधिकार आहेत जे प्रत्येक स्त्री आणि पुरूषाला माणूस या नात्याने प्राप्त झाले आहेत.[3]

**रॅन्डमहाउस विश्वकोष :-**

"मानव अधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत."[4]

मानवी हक्कांची संकल्पना ही नैसर्गिक हक्कांवर आधारलेली आहे. आजचे मानवी हक्क हे नैसर्गिक अधिकारांचे आधुनिक स्वरूपच मानले जाते. नैसर्गिक हक्कांवर आधारलेले आहे. आजचे मानवी हक्क हे नैसर्गिक अधिकारांचे आधुनिक स्वरूपच मानले जाते. नैसर्गिक अधिकार कोणीच हिरावुन घेवु शकत नाही. हॉब, जॉन लॉक आणि रुसो सारख्या सामाजिक कराराच्या सिध्दांताचे पुरस्कर्ते यांनी नैसर्गिक अधिकाराची कल्पना या सिद्धांतातुन प्रतिपादीत केली आणि दैवी अधिकरांचे दैवी अधिरक्षण संपुष्टात आले. राजेशाहीला देखील नियंत्रण करण्यासाठी मानवी हक्कांची कल्पना पुढे करण्यात आली. राजेशाही कितीही अनियंत्रित असली तरी मुलभूत अधिकार हिरावण्याचा राजाला अधिकार नाही. इंग्लंडमधील सन 1215 साली संमत झालेला मॅग्नाकार्ट करार, 1628 चा पिटीशन ऑफ राईटस्, सन 1689 सालाचा बिल ऑफ राईटस हे ब्रिटीश नारिकांच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण करणारे आणि राजसत्तेच्या अधिकारावर बंधने आणणारे करार होते. तसेच अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध 1776, सन 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांतीमागे मानव अधिकारांच्या संरक्षणाची मुख्य प्रेरणा होती. प्रामुख्याने संयुक्त राष्ट्र संघटनेन दि. 10 डिसेंबर 1948 रोजी सर्वसाधारण सभेमध्ये मानवी हक्कांच्या जाहिरनामा मान्य करून तो प्रसिद्ध केलेला आहे. मानवी हक्कांच्या या जाहिरनाम्यात संयुक्त राष्ट्र संघच्या सर्वसदस्य देशांनी मान्य केलेला आहे. मानवी हक्कांच्या या जाहिरनाम्यात एकुण 30 अनुच्छेद असुन त्या बाबतची तपशिलवार माहिती या सोबत जोडलेल्या परिशिष्टात दिलेली आहे. दि. 10 डिसेंबर 2008 रोजी मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यात 60 वर्ष पुर्ण झाली आहेत. त्यामुळे दिनांक 10 डिसेंबर 2007 ते 10 डिसेंबर 2008 हे वर्ष जगभर 'मानवी हक्कांचे वर्ष' म्हणुन साजरे करण्यात आले.[5] या शिवाय दरवर्षी 10 डिसेंबरला हा दिवस जगभर 'मानव हक्क दिन' म्हणुन साजरा केला जातो.

**महिला सबलीकरणाचा इतिहास:**

1. **अमेरिकन स्वातंत्र्याचा आणि फ्रेंच मानव अधिकारांच्या जाहिरनाम्यात प्रतिबींब** - महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही विसाव्या शतकामध्ये गतिमान बनली असली तरी या प्रक्रियेची सुरूवात काही शतकापूर्वीच झाली होती. अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहिरनामा आणि फ्रेंच व्यक्ती स्वातंत्र्याचा जाहिरनामा आणि फ्रेंच व्यक्ती स्वातंत्र्याचा जाहिरनामा यामध्ये महिला सबलीकरण प्रक्रियेचे पहिले प्रतिबिंब पडलेले दिसते. या दोन्ही जाहिरनाम्यामध्ये स्त्री आणि पुरूषांसाठी समान अधिकारांची तरतुद करण्यात आली आहे.

2. **महिला सबलीकरणात साहित्यकारांचे योगदान :-**

अठराव्या शतकामध्ये प्रसिद्ध ब्रिटीश लेखीका मेरीकलस्टोन क्राफ्टने आपल्या साहित्य कृतीमधून महिला अधिकारांचा हिरीरीने पुरस्कार केला. सन 1972 साली प्रकाशित झालेली मेरी कलस्टोन क्राफ्टचे व्हिन्डीकोशन आणि द राईटस ऑफ वेमेन हे पुस्तक म्हणजे महिला सबलीकरणाचा पुरस्कार करणारी पहिला पहिला साहित्यकृती आहे. एकोणिसाव्या शकतामध्ये कॅडी स्टॅनहोन, विल्यम थॉम्पसन, हॅरिएट टेलर, जॉन स्टुअर्ट मिलसारख्या साहित्यकारांनी, विचारवंतांनी स्त्रि मुक्ती विचार तत्कालीन समाजामध्ये रूजविण्याचा प्रयत्न केला.[6]

3. **स्वातंत्र्यपुर्व काळात भारतामध्ये महिला सबलीकरणासाठी प्रयत्न :**

भारतामध्ये 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 20 व्या शतकात प्रारंभी महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्या. रानडे, गोपाल गणेश आकरकर, राजाराम मोहनराय, महर्षी धोंडो केशव कर्वे आदि समाज सुधारकांनी स्त्रियांच्या गुलामगिरी विरुद्ध आवाज उठवुन महिलांना पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये समान अधिकारांची मागणी केली.



Scanned with CamScanner